प्रेस नोट ता. २२/०८/२०२३

# धारदार कोयत्याचा धाक दाखवुन

## सोनसाखळी, मोबाईल चोरी, वाहनचोरी करणारी टोळी जेरबंद

### गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी पिंपरी चिंचवड शहरामध्ये महीलांच्या गळयातील सोन्याचे दागीने हिसडा मारुन चोरणारे, नागरिकांचे महागडे मोबाईल जबरीचोरी करणारे व वाहनचोरीचे गुन्हे करणा-या गुन्हेगारांना जेरबंद करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले होते.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त स्वप्ना गोरे व सहा.पोलीस आयुक्त सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे अधिपत्याखालील गुन्हे शाखा युनिट २ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सातत्याने रेकॉर्डवरील गुन्हेगार, नविन उभरते बाल गुन्हेगार यांचेवर पाळत ठेवून तसेच घडलेल्या गुन्हयांचा बारकाईने अभ्यास करुन गुन्हेगारांचा शोध घेत होते.

निगडी, चिखली, भोसरी परिसरामध्ये घडलेले सोनसाखळी चोरीचे गुन्हे, चिखली परिसरातील तोडफोड व धारदार कोयत्यांचा धाक दाखवुन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करुन गुन्हेगारांच्या टोळक्याने केलेले मोबाईल चोरीचे व वाहनचोरीचे गुन्हयांमध्ये गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी युनिट २ पथकाने पाहणी करुन तसेच गोपनिय बातमीदारांकरवी माहीती घेवून गुन्हयातील आरोपी निष्पन्न केले. निष्पन्न झालेल्या गुन्हेगारांचे मोबाईलचे तांत्रीक विश्लेषण करुन व गुन्हेगारांचा  सातत्याने शोध १) महमंद मुस्ताक सिध्दीकी वय २४ वर्षे, रा. यहिया कॉलनी, सिध्देश्वर मंदिराच्या पाठीमागे, पटेलनगर, लातुर २) पांडुरंग बालाजी कांबळे, वय २३ वर्षे, रा. मु.पो. गौर ता. निलंगा जि. लातुर ३) तुषार ऊर्फ बाळया अशोक माने, वय २४ वर्षे, रा. वराळे रोड समता कॉलनी, तळेगाव दाभाडे ४) अर्जुन संभाजी कदम वय २५ वर्षे सध्या रा. नेवाळे वस्ती, केशवनगर, चिखली, पुणे. मुळ रा. गौर ता. निलंगा जि. लातुर व ४ अल्पवयीन साथीदार यांना शिताफीने ताब्यात घेतले. तसेच चोरीचे दागीने विकणारा व विकत घेणारा पक्षाल मनोज सोलंकी वय २३ वर्षे रा. प्रेमलाके पार्क, चिंचवड, पुणे  व मुराद दस्तगिर मुलाणी वय ३६ वर्षे, रा. वैभवनगर समोर, पिंपरीगाव, मुळगाव- कलेढोण ता. खटाव जि. सातारा यांना ताब्यात घेवून आरोपींकडे अत्यंत कौशल्याने तपास करुन आरोपींनी गुन्हा करणेसाठी वापरलेले ४ धारदार जम्बो कोयते, १ तलवार, चोरीच्या ५ मोटर सायकल, ७ महागडे मोबाईल असा एकूण २,४२,४००/- रुपये किंमतीचा मुदेमाल व  २,५०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने असा एकूण सुमारे ५,००,०००/- रुपये किंमतीचा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत तसेच लातुर जिल्हयामध्ये केलेले उघडकीस केलेले गुन्हे खालीलप्रमाणे-

चैनचोरी गुन्हे उघड एकूण - १३

निगडी  पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५००/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४२२/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४५१/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
एम आय डी सी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३५३/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ६६९/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
देहूरोड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १९८/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
देहूरोड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २७५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
दीघी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २५१/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
लातुर ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४

एमआयडीसी लातुर ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३९४/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
एमआयडीसी लातुर ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४९८/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
एमआयडीसी लातुर ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५४५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४
एमआयडीसी लातुर ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १५५/२०२३ भादवि कलम ३९२, ३४

<u>वाहनचोरी गुन्हे उघड एकूण- ४</u>

भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ६७९/२०२३ भादवि कलम ३७९
रावेत पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ३१७/२०२३ भादवि कलम ३७९ प्रमाणे
देहुरोड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४१५/२०२३ भादवि कलम ३७९ मधील
चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५५२/२०२३ भादवि कलम ३७९ मधील
मोबाईलचोरी गुन्हा उघड - एकूण ७ मोबाईल जप्त
चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५३३/२०२३ भादवि कलम ३७९ मधील
चिखली तोडफोड-
चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५३२/२०२३ भादवि कलम ४२७, ३४, आर्म ॲक्ट ४ (२५)

याप्रमाणे सोनसाखळी चोरीचे १३, वाहनचोरीचे ७, मोबाईल चोरी १ व तोडफोडीचा १ असे एकूण २२ गुन्हे उघडकीस आले आहेत. अटक आरोपीत यांचेकडे सखोल तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक श्री गणेश माने व गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार दिपक खरात, प्रमोद वेताळ, संतोष इंगळे, जमीर तांबोळी, जयवंत राऊत, विपुल जाधव, देवा राऊत, आतिष कुडके, नामदेव कापसे, सागर अवसरे, अजित सानप, शिवाजी मुंढे, संदेश देशमुख, उध्दव खेडकर यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड